# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०५/२०१९
## दि.०५/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३८५/१९,भादविक ३९५ |
| **फिर्यादी** | मोहसीन शेख,वय-४२,रा.उरुळी-कांचन,पुणे |
| **आरोपी** | १.गौरव शिवराम गायकवाड,वय-१९,रा.टाकगाव-चिखली,ता.हवेली,जि.पुणे २.जयदीप नविन कुमार शहा,वय-१९,रा.भुजबळ आळी,चाकण,ता.खेड,जि.पुणे ३.शुभम तात्या काळे,वय-१९, रा. गंगानगर,फुरसुंगी,पुणे ४.अंकीत शिवाजी राऊत,वय-२६,रा.फुरसुंगी,हडपसर,पुणे ५. अमोल राजु शिंदे,वय-२९,रा.गंगानगर,फुरसुंगी,पुणे ६.रोहीत दिपक भोसले,वय-२४ वर्षे,रा.जय भवानी कॉलनी,गंगानगर,फुरसुंगी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०५/२०१९ रोजी पहाटे ०२/३० वा.आकाशवाणी समोर हडपसर पुणे-सोलापूर रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामासाठी पुणे रेल्वे स्टेशनवर पहाटे ०२/०० वा. येवुन,नमुद इसमाचे रिक्षात बसुन उरळी-कांचन येथे जात असताना,हडपसर येथील आकाशवाणी केंद्रा समोर रिक्षा आली असताना,सदर रिक्षाचालक यांनी त्यांची रिक्षा थांबवून,त्याचेबरोबर असणारे एकाचे मदतीने यातील फिर्यादीस दारू पिण्यासाठी पैसे मागुन,त्यांनी नकार दिला असता, फिर्यादीस रस्त्यावरील दगड फेकून मारून जखमी केले. त्याचवेळेस त्याचे मोबाईलवरून इतर साथीदारांस मिस कॉल करून,सदर ठिकाणी मोटार सायकलवर बोलावुन घेवुन, त्यांचेकडील कोयत्याचा धाक दाखवुन बळजबरीने,फिर्यादीचे खिशातील मोबाईल व रोख ७००/- रूपये रक्कम असा एकुण १८,७००/- रू किचा ऐवज जबरदस्तीने काढुन घेतला आहे. यातील फिर्यादी यांचेवर ससुन रूग्णालय येथे उपचार घेतल्यानंतर त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे. (सदर इसमांकडुन एक रिक्षा व दोन मोटार सायकली हे ताब्यात घेतले.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, चव्हाण ७०३८१९९३०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २३५/१९,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-७५,रा.दत्तवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१९ रोजी २३/३० ते दि.०४/०५/२०१९ रोजी ०७/३० वा.फ्लॅट नं.१०१,सारंग अपार्टमेंट,तपोभुमी,दत्तवाडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख २ हजार रूपये,अमेरिकन डॉलर,मनगटी घडयाळ, कॅमेरा सोन्याचे दागिने असा एकुण १,४५,०००/-रु किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अभंग ८१०८११०६५१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १८६/१९,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | गोपी शर्मा,वय-३४,रा.लेबर कॅम्प,ब्रम्हा बुलेवार्ड कन्स्ट्रक्शन साईट,पुणे स्टेशन पुणे |
| **आरोपी** | १.सेफ्टी सुपरवायझर २.ठेकेदार ३.इंजिनिअर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०५/२०१९ रोजी सकाळी ०९/४५ वा.ब्रम्हा बुलेवार्ड कन्स्ट्रक्शन साईट,पुणे स्टेशन पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम १.सेफ्टी सुपरवायझर २.ठेकेदार ३. इंजिनिअर यांनी त्यांचे ब्रम्हा बुलेवार्ड कन्स्ट्रक्शन साईट,पुणे स्टेशन पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील, मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना धोकादायकरित्या क्रेन मधील लोखंडी चॅनल उतरविताना, क्रेन मधील |

लोखंडी चॅनल हे व्यवस्थित असलेबाबत खात्री न करता,ते धोकादायकरित्या उतरविताना,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील मजुर कामगार श्रवणकुमार देवीलाल दास,वय-३२ वर्षे,रा. लेबर कॅम्प,ब्रम्हा बुलेवार्ड कन्स्ट्रक्शन साईट,पुणे स्टेशन पुणे हा इमारतीचे चौथ्या मजल्यावर काम करीत असताना,मटेरियल सप्लाय करणारी क्रेन मधील लोखंडी चॅनल हे श्रवणकुमार याचे डोक्यात पडुन,त्याचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,तो मयत झाला.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) शिंदे ९८२३८७८८११

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ३९७/१९,भादविक ३५३,३३२,५०४,३४

**फिर्यादी** नानासाहेब मोरे, पो.ना. कोंढवा वाहतुक विभाग,पुणे शहर

**आरोपी** मोपेडवरील पाठीमागे बसलेला इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०५/०५/२०१९ रोजी १६/४० वा. कोंढवा वाहतुक विभाग कार्यालय,पुणे शहर सार्वजनिक रोडवर कोंढवा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे पोलीस सहकारी पोलीस हवा.थोरवे, पो.शि.वाघमारे, पो.शि.झरेकर यांचेसह वाहतुक नियमन पी.टी.पी. कारवाई करीत असताना,नमुद इसम हा ॲक्टीवा मोपेड वरती पाठीमागे बसुन जात असताना,फिर्यादी यांनी त्यांना थांबवुन त्यांचेकडे कागदपत्रा बाबत विचारणा केली असता,सदर इसमाने फिर्यादी व इतर पोलीस स्टाफ यांना अपशब्द वापरुन, त्यांचे बरोबर झटापट करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण करून,फिर्यादीस दुखापत केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. निंबाळकर ९८३४४९८४४२

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** सिंहगड पो स्टे ३६१/१९,भादविक ३७९,४२७

**फिर्यादी** संदेश राऊत,पो.शि. दत्तवाडी वाहतुक विभाग,पुणे शहर

**आरोपी** मोटार सायकलवरील इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०५/२०१९ रोजी २१/४० वा. दत्तवाडी वाहतुक विभागाचे समोर सिंहगड रोड

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी यातील नमुद मोटार सायकलवरील इसमाचे वाहनास कारवाईसाठी सरकारी जॅमर ५ हजार रू किचे लावले असताना,सदर इसमाने सदरचा सरकारी जॅमर हा चोरी करून नेला आहे.

**त.अंमलदार** पो.हवा. शेख ८३८००९२६०१

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ३९६/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला,वय-२३ वर्ष,रा.मिठानगर कोंढवा-खुर्द,पुणे

**आरोपी** एक महिला,रा.मुकुंदनगर,अहमदनगर (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२३/०४/२०१९ रोजी १०/०० वा. पासुन ते दि.२४/०४/२०१९ रोजी पहाटे ०५/०० वा.चे दरम्यान घर नं.६ गल्ली नं.२,काकडे वस्ती,कोंढवा,पुणे येथुन

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांचेकडील ९५,०००/- रुपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण २,७५,०००/- रू किचा ऐवज त्यांचे राहते घरातील कपाटात ठेवले असताना,यातील नमुद महिला हिने फिर्यादी यांची नजर चुकवुन,सदरचा ऐवज चोरी करून नेले.

**त.अंमलदार** पो.ना. साळुंखे ९५६१६०९२७४

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**